महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्र. १४४२(२)(२)/२०१९/तेवीस दिनांक : ०६ जून, २०२२.

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय:-** महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा- २०१९, पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाच्या गुणांच्या फेरपडताळणीबाबत (Retotalling) करीता अर्ज सादर करण्याबाबत

**संदर्भ:-** जाहिरात क्रमांक ०१/२०१९ व अधिसूचना क्र.०८/२०१९

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०१९ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा सुधारित अंतिम निकाल दिनांक ०१ जून, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत निकालाद्वारे शिफारसपात्रपात्र न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' मधील 'View Marksheet' या वेबलिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणाऱ्या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(४) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(५) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करुन 'Save' बटनवर क्लिक करावे.

(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक १६ जून, २०२२ रोजी २३:५९ वाजेपर्यंत सुरु राहील.

४. उपरोक्त कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोलफ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

उपसचिव (परिक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई